15-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/14/2025 10:08 PM Page 1



## निवडक

### गुणवत्ता यादी आज होणार जाहीर

■ टीम दैनिक हेराल्ड

- प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया
- १६मे पासून समुपदेशन सुरू

**पर्वरी, दि. १४ :** उच्च शिक्षण संचालनालयातंर्गत येणाऱ्या शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयांची प्रथम वर्ष प्रवेशासाठीची गुणवत्ता यादी आज दि. १५ रोजी जाहीर होणार असून उद्या दि.१६ मे पासून संबंधित महाविद्यालयांमध्ये समुपदेशन होणार असल्याचे उच्च शिक्षण संचालनालयाकडून कळविण्यात आलेले आहे. ही गुणवत्ता यादी आज संबंधित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावरून प्रदर्शित केली जाईल. यामध्ये बीए, बीकॉम, बीएससी (सामान्य आणि कृषी), बीसीए, बीबीए, बी.एससी डेटा सायन्स आणि संगीत, बी.एससी क्रीडा विज्ञान यासह विविध पदवीपूर्व कार्यक्रमांमध्ये ८,५०० हून अधिक जागा समाविष्ट आहेत. गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांसाठी १६ मे २०२५ पासून संबंधित महाविद्यालयांमध्ये समुपदेशन सुरू होईल. ज्या विद्यार्थ्यांची नावे गुणवत्ता यादीत आहेत, त्यांनी १६ तारखेला महाविद्यालयात येऊन प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी दि. १६ रोजी महाविद्यालयात येताना मूळ लिव्हिंग सर्टिफिकेट (शाळा सोडल्याचा दाखला), जात प्रमाणपत्र, दहावी–बारावी मार्कलिस्ट झेरॉक्स, दोन फोटो, आधारकार्ड आदी कागदपत्रे घेऊन पालकांसहीत यावयाचे आहे व संबंधित महाविद्यालयात प्रवेश शुल्क भरून प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

ज्या विद्यार्थ्यांची नावे गुणवत्ता यादीत आहेत, त्यांनी दिलेल्या तारखांना प्रवेश नाही घेतला तर त्यांचा अर्ज रद्द करून वेटिंग लिस्टवरील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. त्यामुळे गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांनी दि. १६ रोजी कागदपत्रे आणि पालकांसहीत संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहावे. दरम्यान, बीए–एलएलबी (बीएएलएलबी) कार्यक्रमाचा निकाल लवकरच जाहीर केला जाईल. एकात्मिक बीए–बीएड आणि बी.एससी–बीएड कार्यक्रमांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अजूनही सुरू आहे. अधिक माहिती आणि सूचनांसाठी संबंधित महाविद्यालयांचे अधिकृत संकेतस्थळ आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या पोर्टलला भेट द्यावी.

---

### प्रोग्रेस हायस्कुलतर्फे बाजार दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १४ :** साखळी येथील प्रोग्रेस हायस्कुलतर्फे बाजार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांना व्यापार,व्यवसाय,खरेदी विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव यावा तसेच व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने या बाजार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी,भाजी,नारळ,खाद्यपदार्थ व जीवनावश्यक वस्तूंची विक्री केली.यावेळी पालकांनी विद्यार्थ्यांनी विक्रीस ठेवलेल्या वस्तूंची खरेदी करून मुलांना प्रोत्साहन दिले.

# आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये होण्याची शक्यता

## १७ मे पासून स्पर्धा | १३ सामन्यांचे वेळापत्रक जाहीर : अंतिम सामना ३ जून रोजी

**नवी दिल्ली, दि. १४ :**

आयपीएल २०२५ चा अंतिम आणि क्वालिफायर २ अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवला जाऊ शकतो. या स्पर्धेचा अंतिम सामना ३ जून रोजी खेळवला जाणार आहे. एक दिवस आधी बीसीसीआयने आयपीएलच्या उर्वरित १३ सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले होते. पण प्लेऑफची ठिकाणे निश्चित झाली नव्हती.

क्रिकबझच्या अहवालानुसार, अहमदाबादची निवड १ जून रोजी होणाऱ्या क्वालिफायर–२ आणि ३ जून रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यासाठी करण्यात आली आहे. प्लेऑफ ठिकाणे जाहीर न करण्याचे एकमेव कारण म्हणजे हवामान.

वेळापत्रक अंतिम करण्यापूर्वी बोर्ड देशभरातील मान्सूनच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहे. हवामान खात्यानुसार, जूनच्या सुरुवातीला अहमदाबादमध्ये पाऊस पडण्याची शक्यता नाही. पाकिस्तानसोबतच्या तणावामुळे ९ मे रोजी आयपीएल स्थगित करावे लागले. देश सध्या युद्धाच्या स्थितीत आहे असे सांगून बीसीसीआयने स्पर्धा पुढे ढकलली होती. अशा परिस्थितीत क्रिकेट स्पर्धा आयोजित करणे योग्य नाही.

आरसीबी आणि केकेआर यांच्यातील पहिला सामना १७ मे रोजी बंगळुरूमध्ये खेळला जाईल. उर्वरित सामने जयपूर, दिल्ली, लखनौ, मुंबई आणि अहमदाबाद येथे खेळवले जातील. लीग स्टेज २७ मे रोजी



संपेल. रविवार, १८ आणि २५ मे रोजी २ डबल हेडर सामने खेळले जातील. म्हणजेच ११ दिवसांत १३ लीग स्टेज सामने होतील.

८ मे रोजी धर्मशाला येथे होणारा पंजाब आणि दिल्ली यांच्यातील सामना पाकिस्तानच्या हल्ल्यांमुळे थांबवावा लागला. हा सामना आता २४ मे रोजी जयपूर येथे खेळला जाईल. प्लेऑफ सामन्यांचे ठिकाण अद्याप निश्चित झालेले नाही. यापूर्वी, हैदराबाद आणि कोलकाता येथे २–२ प्लेऑफ सामने खेळवले जाणार होते.

आयपीएल २०२५ अंतर्गत ७४ सामने खेळवले जाणार होते. ७ मे पर्यंत ५७ सामने खेळले गेले होते, ८ मे रोजी ५८ वा सामना मध्येच थांबवावा लागला. म्हणजे आता १७ सामने शिल्लक आहेत. यापैकी १३ सामने लीग टप्प्यातील आहेत आणि ४ सामने प्लेऑफ टप्प्यातील आहेत.

**कोणत्या संघांचे सामने शिल्लक आहेत?**

मुंबई, कोलकाता, राजस्थान आणि चेन्नई यांचे प्रत्येकी दोन लीग सामने शिल्लक आहेत. उर्वरित संघांनी अद्याप प्रत्येकी तीन लीग सामने खेळलेले नाहीत. खाली दिलेल्या पॉइंट्स टेबलवरून संघांची स्थिती समजू शकते. एका संघाला १४ लीग सामने खेळावे लागतात.

**प्लेऑफच्या शर्यतीत अजूनही किती संघ आहेत?**

आयपीएलच्या १० पैकी तीन संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. हैदराबाद, राजस्थान आणि चेन्नई हे तीन संघ स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. उर्वरित संघ अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहेत.

**सर्व परदेशी खेळाडू अजूनही भारतात आहेत का?**

नाही. जेव्हा बीसीसीआयने लीग स्थगित करण्याचा निर्णय घेतला तेव्हा परदेशी खेळाडू आणि सपोर्ट स्टाफना त्यांच्या देशात परतण्यास सांगण्यात आले. यातील बरेच खेळाडू त्यांच्या घरी परतले आहेत. त्यांना पुन्हा बोलावले जाईल. तथापि, काही ऑस्ट्रेलियन खेळाडू वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल लक्षात घेऊन भारतात येण्यास नकार देऊ शकतात.

**उर्वरित सामने मे महिन्यातच का आयोजित करावेत?**

दरवर्षी आयपीएलसाठी एप्रिल–मे ही विंडो उपलब्ध असते. याचा अर्थ असा की या काळात जगात कुठेही कोणतीही मोठी मालिका होत नाही. जर उर्वरित आयपीएल सामने मे महिन्यात झाले नाहीत तर बोर्डाला सप्टेंबरपर्यंत वाट पहावी लागेल.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना ११ जूनपासून ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला जाणार आहे. यानंतर, भारतीय संघाला इंग्लंडचा दौरा करायचा आहे, जिथे २० जूनपासून ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू होईल. उर्वरित संघ देखील ऑगस्टपर्यंत वेगवेगळ्या मालिकांमध्ये व्यस्त असतील. म्हणूनच बीसीसीआयने मे महिन्यातच आयपीएल संपवण्याची योजना आखली.

# कोहलीच्या निवृत्तीवर प्रीती झिंटाची भावुक पोस्ट


**मुंबई, दि. १४ :**

विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याने केवळ क्रिकेट चाहतेच नव्हे, तर अभिनेत्री प्रीती झिंटालाही मोठा धक्का बसला आहे. विराटने खेळात प्रचंड ऊर्जा निर्माण केली आणि त्याच्या निवृत्तीनंतर कसोटी क्रिकेट पूर्वीसारखे राहणार नाही, असे तिने म्हटले आहे. आता भारतीय खेळाडूंना विराट, रोहित आणि अश्विनची जागा घ्यावी लागेल, असेही प्रीतीने नमूद केले.

टीम इंडियाचा स्टार खेळाडू विराट कोहली याने कसोटीमधून निवृत्ती जाहीर केली आहे. फक्त विराटच्याच नाहीतर क्रिकेट चाहत्यांसाठी त्याची निवृत्तीने सर्वांनाच धक्का बसला. १२ मे ला विराट कोहलीने सोशल मीडियावर पोस्ट करत आपल्या निवृत्तीची घोषणा केली होती. विराटच्या निवृत्तीवर देशातील सर्व क्षेत्रातील दिग्गजांनी विराटला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रीती झिंटा काय म्हणाली?

मी कसोटी क्रिकेट फक्त विराटसाठी



बघत होते, त्याने त्याच्या स्पर्धात्मकतेमुळे आणि उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या प्रबळ इच्छेने खेळात पॅशन निर्माण केली. मला नाही वाटत की यानंतर टेस्ट क्रिकेट पूर्वीसारखे राहील. मी त्याला भविष्यासाठी शुभेच्छा देते. विराट, रोहित आणि अश्विन यांच्यासारखे खेळाडू आता टेस्ट क्रिकेट खेळणार नाहीत. त्यामुळे भारतीय खेळाडूंना त्यांची जागा भरून काढावी लागेल, असं प्रीती झिंटाने म्हटलं आहे.

इंग्लंड दौरा तोंडावर असताना विराट कोहलीने कसोटीमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. रोहित शर्मा याने ७ मे ला कसोटीमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यानंतर पाच दिवसातच विराटने हा निर्णय घेतला. टीम इंडियाचे दोन रत्न निवृत्त झाले असल्याने टीम इंडियासाठी मोठा धक्का मानला जात आहे. कारण आता टीममध्ये त्यांची जागा भरून काढणाऱ्या खेळाडूंचा टीम मॅनेजमेंटला शोध घ्यावा लागणार आहे. विराट कोहलीचा शेवटचा पाच वर्षातील फॉर्म सोडता त्याआधी त्याने प्रत्येक सामन्यामध्ये धावा काढल्या आहेत. विराट कोहलीने कित्येक सामने एकहाती जिंकून दिले आहेत. खासकरून विराटच्या कर्णधारपदाखाली टीम इंडिया निडरपणे विरोधी संघांच्या होम ग्राऊंडवर जात आपला प्रभाव दाखवू लागली होती.

# आयपीएल २०२५ आता नवीन नियमांनुसार खेळवणार

**मुंबई, दि. १४ :**

आयपीएल आता नव्याने खेळवण्यात येणार आहे. पण या आयपीएलसाठी आता नवीन नियमही असणार आहेत. हे नवीन नियम नेमके काय असतील, ते आता बीसीसीआयने स्पष्टपणे सांगितले आहे.

पाकिस्तानने भारतावर हल्ला केला आणि काही वेळामध्येच आयपीएलचा पंजाब आणि दिल्ली यांच्यातील सामना रद्द केला गेला. त्यानंतर एका आठवड्यासाठी आयपील स्थगित करण्यात आली. त्यामुळे आता १७ मे या दिवसापासून पुन्हा आयपीएल सुरु करण्यात येणार आहे. पण आयपीएल आता नवीन नियमांनुसार होणार आहे. बीसीसीआयने सर्व संघांना हे नवीन नियम सांगितले आहेत आणि त्यानुसार आता सर्व संघ आयपीएलच्या मैदानात







उतरणार असल्याचे आता समोर आले आहे.

आयपीएल एका आठवड्यात पुन्हा सुरु करणं, हे मोठं आव्हान असणार आहे. कारण सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा भारतावर हल्ला झाला आणि सामना रद्द करण्यात आला. त्यानंतर बरेच परदेशी खेळाडू हे आपल्या देशात परतले आहेत. त्यापैकी काही खेळाडू हे पुन्हा ही आयपीएल खेळण्यासाठी भारतात परतणार नाहीत. त्यामुळे आता त्या परदेशी खेळाडूंच्याऐवजी काय करायचे, हा मोठा प्रश्न सर्व संघांसमोर पडलेला होता. पण त्याचवेळी बीसीसीआय पुढे आली आणि त्यांनी आता एक नविन नियम आणला आहे. परदेशी खेळाडू जे आता पुन्हा येणार नाही, त्यांच्यावर जास्त विचार आता केला जाणार नाही. पण नवीन खेळाडू संघात दाखल करण्यासाठी आता बीसीसीआयने नवीन नियम आणला आहे. बीसीसीआयच्या या नवीन नियमानुसार जे खेळाडू पुन्हा येणार नाहीत, त्यांच्या जागी नवीन खेळाडू तात्पुरत्या स्वरुपात संघात दाखल करण्यात येऊ शकतात, असा नवीन नियम आता बीसीसीआयने आणला आहे. त्यामुळे खेळाडूंना तात्पुरते संघात दाखल केले जाऊ शकते आणि पुढच्या आयपीएलच्या वेळी त्यांचा विचार संघ करू शकतो किंवा त्यांना संघाबाहेरही करू शकतो. बीसीसीआयच्या या नवीन नियमाचा आयपीएल लवकर सुरु करण्यासाठी आता या नवीन नियमचा चांगलाच फायदा होऊ शकतो. आयपीएल आता नवीन नियमानुसार सुरु करण्यात येणार आहे. या नवीन नियमांचा आयपीएल सुरु करण्यासाठी आता चांगलाच फायदा होऊ शकतो, असे समोर आले आहे.

# लिव्हिंगस्टनला इंग्लंडच्या वनडे, टी–२० संघातून वगळले

## हॅरी ब्रुकच्या कायमस्वरूपी नेतृत्वाखाली पहिली मालिका | २१ मे रोजी वेस्ट इंडिजशी सामना

**नवी दिल्ली, दि. १४ :**

२९ मे पासून वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू होणाऱ्या पांढऱ्या चेंडूवरील मालिकेसाठी इंग्लंडने एकदिवसीय आणि टी–२० संघाची घोषणा केली. लियाम लिव्हिंगस्टनला संघात स्थान मिळाले नाही. गुजरात टायटन्सकडून आयपीएल खेळणारा जोस बटलर देखील संघाचा भाग आहे, त्यामुळे त्याला प्लेऑफ सामने खेळणे कठीण आहे.

हॅरी ब्रूकला व्हाईट बॉल संघाचा कायमस्वरूपी कर्णधार बनवल्यानंतर इंग्लंडची ही पहिलीच मालिका आहे. फिल सॉल्टला एकदिवसीय संघात संधी मिळाली नाही, तो ६ जूनपासून टी–२० मालिका खेळेल.

डावखुरा फिरकी गोलंदाज लियाम डॉसनला २०२२ नंतर पहिल्यांदाच टी–२० संघात स्थान मिळाले. फिल सॉल्टनेही सर्वात लहान फॉरमॅटच्या संघात पुनरागमन केले. विल जॅक्सला दोन्ही संघात स्थान मिळाले. जोफ्रा आर्चर एकदिवसीय मालिका खेळेल, परंतु त्याची दुखापत लक्षात घेऊन त्याला टी–२० मालिकेतून बाहेर ठेवण्यात आले आहे.

२०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीतील पराभवानंतर यष्टीरक्षक जोस बटलरने इंग्लंडच्या एकदिवसीय आणि टी–२० कर्णधारपदाचा राजीनामा दिला. त्याच्यानंतर हॅरी ब्रूकला कर्णधारपद देण्यात आले. बटलरच्या नेतृत्वाखाली, इंग्लिश संघ २०२४ च्या टी२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत आणि




२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या गट टप्प्यात बाहेर पडला. तथापि, त्याच्या नेतृत्वाखाली संघाने २०२२ चा टी२० विश्वचषक जिंकला.

वेस्ट इंडिजने ५ मे रोजीच इंग्लंड दौऱ्यासाठी आपला संघ जाहीर केला होता. आमिर जांगू आणि ज्वेल अँड्र्यू यांना संघात स्थान मिळाले, तर शिमरॉन हेटमायरला वगळण्यात आले. शाई होप दोन्ही संघांचे नेतृत्व करेल, तर ब्रँडन किंग आणि एविन लुईस टी२० मध्ये डावाची सुरुवात करू शकतात. आयपीएलमध्ये लखनौचा भाग असलेला शामर जोसेफ देखील संघाचा भाग आहे.

कॅरिबियन संघ इंग्लंडचा सामना करण्यापूर्वी २१ मे पासून डब्लिनमध्ये आयर्लंडविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळेल. आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी बोर्डाने एकाच संघाची घोषणा केली. बोर्डाने टी–२० संघाची घोषणा केली नाही.

**वेस्ट इंडिज एकदिवसीय संघ**

शाई होप (कर्णधार), ज्वेल अँड्र्यू, कीसी कार्टी, रोस्टन चेस, मॅथ्यू फोर्ड, जस्टिन ग्रीव्हज, आमिर जंगू, अल्झारी जोसेफ, शमर जोसेफ, ब्रँडन किंग, एविन लुईस, गुडाकेश मोती, शेरफेन रदरफोर्ड, जयडेन सील्स आणि रोमॅरियो शेफर्ड.

एजबॅस्टन येथे पहिला एकदिवसीय सामना

वेस्ट इंडिज आणि इंग्लंड यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना २९ मे रोजी खेळला जाईल. उर्वरित २ एकदिवसीय सामने १ आणि ३ जून रोजी कार्डिफ आणि केन्सिंग्टन ओव्हल येथे खेळले जातील. ६, ८ आणि १० जून रोजी ३ टी–२० सामने खेळले जातील. हे सामने डरहम, ब्रिस्टल आणि साउथहॅम्प्टन येथे होतील.

**इंग्लंड संघ**

एकदिवसीय संघ: हॅरी ब्रुक (कर्णधार), जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, ब्रायडन कार्स, बेन डकेट, टॉम हार्टली, विल जॅक्स, साकिब महमूद, जेमी ओव्हरटन, मॅथ्यू पॉट्स, आदिल रशीद, जो रूट आणि जेमी स्मिथ.

टी–२०: हॅरी ब्रुक (कर्णधार), रेहान अहमद, टॉम बँटन, जेकब बेथेल, जोस बटलर, ब्रायडन कार्स, लियाम डॉसन, बेन डकेट, विल जॅक्स, साकिब महमूद, जेमी ओव्हरटन, मॅथ्यू पॉट्स, आदिल रशीद, फिल सॉल्ट आणि ल्यूक वूड.

# 'अनुभवाचे बोल' ललित लेखसंग्रहाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १४ :** लेखिका गौरी वेर्लेकर यांचे 'अनुभवाचे बोल' म्हणजे त्यांच्या जीवनातील उत्तम अनुभवाचे शब्दरूप असल्याचे प्रतिपादन गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत यांनी केले.

आरोबा येथील मांगरिश विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका गौरी वेर्लेकर यांच्या 'अनुभवाचे बोल' या ललित लेख संग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानावरून ते ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक शशिकांत पुनाजी, लेखिका गौरी वेर्लेकर, सौ. वाटवे, रोशन वेर्लेकर, संगम भोसले आदी उपस्थित होते.

प्रा. अनिल सामंत म्हणाले, चांगले वाचा त्याचबरोबर चांगले जगा. जगण्यातून आनंद मिळतो त्यातून संवेदनशीलता जागृत होते. त्या सृजनशीलतेतून दर्जेदार साहित्य कृती निर्माण होते. चांगले अनुभव जीवनात आनंद निर्माण करतात. प्रस्तुत लेखिकेने जे जीवननुभव घेतले त्यातून आपले जीवन आनंददायी केले आणि त्या अनुभवाना शब्दांद्वारे जिवंत करून इतराना आनंददायी स्वानुभवाची शिदोरी देण्याचा प्रयत्न केला आहे. जो पुस्तक रूपाने पहिल्या प्रथमच आणला आणि तो यशस्वी ही करून दाखवला आहे . तीने मराठी साहित्य विश्वात दमदारपणे पाऊल टाकले



**आरोबा : 'अनुभवाचे बोल' ललित लेख संग्रहाचे प्रकाशन करताना अनिल सामंत. बाजूला शशिकांत पुनाजी, गौरी वेर्लेकर, संगम भोसले, रोशन वेर्लेकर व सौ. वाटवे.**

आहे. कमीत कमी शब्दातून जास्तीत जास्त सांगणारा हा यशस्वी लेखक होतो गौरी वेर्लेकर यांचे लेखनही असेच कसदार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'अनुभवाचे बोल' या पुस्तकातील विविध लेखांचे पैलू उलगडून दाखवले.

शशिकांत पुनाजी म्हणाले, प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिका गौरी वेर्लेकर यांनी चाकोरी बद्ध लेखन न करता स्वानुभवाने साहित्य निर्मिती केली आहे त्यामुळेच त्यांच्या साहित्यिक मूल्यानी उंची गाठली आहे. नवोदित लेखकांनी प्रगल्भ वाचन करायला हवे त्यातूनच सकस साहित्य निर्मिती शक्य आहे. गौरी वेर्लेकर या जशा उत्तम शिक्षिका आहेत शिक्षक आणि साहित्य ज्यावेळी समांतर रेषेत जाते त्यावेळी ती दोन्ही क्षेत्रात यशस्वी होते. भविष्यात त्यांनी असेच दर्जेदार साहित्य निर्माण करावे असे सांगितले.

गौरी वेर्लेकर यांनी सांगितले की, शालेय शिक्षणातच मला वाचनाची आवड होती. त्याला खतपाणी मिळाले ते सारस्वत उच्च माध्यमिक विद्यालयात शिकताना. प्राचार्य अनिल सामंत सरानी माझ्यात साहित्यिकमूल्ये रुजवली महाविद्यालयीन शिक्षण घेताना माझा वाचनाचा वेग वाढला त्यानंतर अनेकांनी मला या क्षेत्रात मार्गदर्शन केले. माझ्या लेखणीला बळ दिले, असे सांगताना त्यांनी अनेकांची नावे घेतली. त्यामुळेच आज तुमच्या पुढे लेखिका म्हणून उभी राहू शकल्याचे तिने कृतज्ञता पूर्वक नमूद केले. मला लेखिका म्हणून पुढे आणण्यात माझ्या कुटुंबीयांचे मोठे योगदान आहे, त्यात माझे पती खंबीरपणे उभे राहिले त्यामुळेच मी लेखन करू शकल्याचे त्यांनी सांगितले.

पुस्तक प्रकाशनात प्रकाशिका स्नेहा सुतार यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे त्या म्हणाल्या.

नव्या वेर्लेकर, स्पृहा वेर्लेकर, रोशन वेर्लेकर यांनी व्यासपीठावरील मान्यवरांना पुष्प गुच्छप्रदान केले तसेच भेट वस्तू प्रदान केल्या.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 252 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .